Vidyawarta UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

International Multilingual Refereed Research Journal

Issue-26, Vol-02 April to June-2018

Editor
Dr.Bapu G.Gholap

Scanned with CamScanner

आहे. एकूणच निसर्गाचे चैतन्य बालकवी प्रतिपादन करतात. हाच बालकवींचा नव्या कवितेतील आविष्कार मराठी समाजमनाला आवडला. त्याचेच पुढे मराठी कवितेत प्रवाहात रूपांतर झाले. यात अनेक कवी पुढे पुढे, आजपर्यंत प्रतिनिधीत्व करते झाले. याचे सारे श्रेय जाते ते बालकवींना. म्हणूनच रमेश वरखेडे त्यांना 'नव्या सृष्टीचा नव्या यशाचा शिलेदार' असे म्हणतात. अशा निसर्गाच्या अनेक सौंदर्य स्थळांना मराठीत शब्दांच्या माध्यमातून प्रतिबिंबीत करणारे बालकवी एकूणच सृष्टीला अधोरेखित करत राहतात. निसर्गाचा सहवास, सानिध्य हेच त्यांच्या या शब्दपसाऱ्याचे प्रेरणास्थान होते. निसर्गाचे दिव्यत्व जाणने आणि आनंदाची परमोच्च अनुभूती घेणे हाच त्यांच्या कवितेचा ध्यास होय. हीच भावात्मकता आजही त्यांचा वाचक, रसिक, समीक्षक अनुभवतो आहेच.

**संदर्भ सूची:**

१. संपादक, नंदा आपटे, समग्र बालकवी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००५, पृष्ठ क्र. १६.

२.रा.श्री. जोग, प्रदक्षिणा, खंड पहिला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००७, पृष्ठ क्र. ११.

३. डॉ. व.दि. कुलकर्णी, काव्य आणि काव्यास्वाद, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ११.

❑ ❑ ❑

**22**

# काळया आईवरील कविता

डॉ. पैकेकरी एस. पी.
असि. प्रोफेसर,
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत,
जिल्हा— अहमदनगर

**********

विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली।।
नीतिविना गती गेली। गती विना वित्त गेले।।
वित्तविना शूद्र खचले।
इतके अनर्थ एका अविद्येने केले।।

जनसामान्यांना शिक्षणच नव्हते तेव्हा त्यांची अवस्था कशी होती हे महात्मा फुले यांनी आपल्या अखंडातून सांगितले. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचा आसूड व तृतीय रत्न ही पुस्तके लिहून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. शेतकऱ्यांचाही प्रश्न असतो हे दाखवून दिले. बहुजनांना व स्त्रियांनी पिढयांपिढया शिक्षणापासून वंचित ठेवले होते. त्यांना शिक्षण देऊन त्यांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क दिला. शिक्षणानंतरच मी कोण? हा प्रश्न उपस्थित झाला व अस्तित्वाची लढाई सुरु झाली. आपला भारत हा खेडयांचा देश आहे व मुख्य व्यवसाय शेती आहे. तरी आमचा शेतकरी पिढयांपिढया दारिद्रयातच जगताना दिसतो. इ.स. १९४७ या वर्षी भारत स्वतंत्र झाला व सन १९५० या वर्षी आपण राज्यघटनेची अमंलबजावणी सुरु केली. घटनेनुसार सर्वांना सर्व अधिकार मिळाले. शिक्षण मिळाले व त्यातून अनेक चळवळी सुरु झाल्या व साहित्य निर्माण होऊ लागले. ग्रामीण साहित्याची सुरवातही १९६० नंतर झाली. सुरवातीचे ग्रामीण साहित्य फडके खांडेकर व माडखोलकर यांच्या प्रेरणेने रंजनवादी निर्माण होऊ लागले. पण नंतर १९७० नंतर मात्र अस्सल ग्रामीण साहित्य निर्माण झाले. पहिले ग्रामीण कवी म्हणून ग.ल. ठोकळांचा उल्लेख केला जातो.



Scanned with CamScanner

पण खरी ग्रामीण चळवळ १९७० पासून सुरु झाली. आनंद यादवांनी आपल्या अनेक कविता संग्रहातून अस्सल ग्रामीण जीवन मांडण्यास सुरवात केली. शेतकऱ्याचा मुख्य व्यवसाय शेती असल्याने शेतीसाठी पावसाची गरज असते. पाऊस संदर्भात व शेती संदर्भात अनेक कविता आहेत. आनंद यादवांची गर्भ धरणीचा ही कविता महत्वाची आहे.

झुरु लागली पालवी
मरु लागलं अंकूर
गर्भ धरणीचा देवा
आत तसाच राहील.
किंवा
युगे युगे कधी मुखी
नृही पावसाचा थेंब
दग्ध मातीवर तिच्या
नाही उगवल कोंब

पेरणी करुनही पाऊस पडला नाहीतर पेरलेले बी जमीनीतच राहतात कोंब फुटत नाही तर ते ही गर्भातच मरतात अशा शब्दात शेतकऱ्याचा प्रश्न मांडला आहे.

रविचंद्र हडसनकर यांनी 'उद्या' या कवितेत दुष्काळाचे वर्णन केले आहे. दुष्काळात शेत पिकत नाही ही माणसे उपाशीपोटी दुष्काळाच्या कामावर जातात कवी लिहितात—

दुष्काळ, दुष्काळ, त्यात पेटलं अभाळ
किलोभर मिलोसाठी कोस कोस धावपळ
जसं रान उणगलं, तस मत उबगलं
त्याचा भुकेचा वणवा चोकाळून गलबलकृ

वरील कवितेत दुश्काळ पडल्यावर शेतकऱ्याची अवस्था कषी होते ते सांगितले आहे. जगाला पोसणारा पोशिंदा मात्र किलोभर मिलोसाठी कोस कोसभर चालून कामाला जातो.

सुधाकर गायधनी यांनी आपल्या कवितेतून शेतकऱ्यांचे दुःख मांडले व शेतकऱ्याचे राज्य यावे अशी आशाही व्यक्त केली आहे.

ज्यानं मातीतून आपल्यामाती रात्रदिस भाकरी उपसल्या
त्यांच्या काळजाच्या भेगा सांगा कोण कोण तपासल्या

वेळेवर पाऊस पडला नाहीतर शेतात, काळयामातीवर अषा भेगा पडतात तशाच भेगा शेतकऱ्याच्या काळजावरही पडतात पण याचा विचार कोणीच करीत नाही.

ऐश्वर्य पाटेकर या कवीचा भुईषास्त्र हा पहिलाच कविता संग्रह प्रकाशित झाला. व अनेक पुरस्काराने सन्मानित झाला. कारण त्यांनी आपल्या भूमीचेच शास्त्र सांगण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मायमाती या कवितेतही आईच्या मुखी एक ओवी घातली आहे.

भेगाडल्या माय बाई,
कसं कसं षिवू तुला
कोण्या दुष्मनानं माझा
सुई दोरा चोरुन नेला
किंवा
मायबाई मायबाई
तुझं माझं दुःख एक
लबाडाची दुनिया ग
नेई लुबाडून सुख

या कवितेतून कविंनी काळया आईचे दुःख मांडत मांडत स्त्रीची वेदनाही प्रकट केली आहे. पाऊस न आल्याने जमीनीला भेगा पडतात त्या शिवण शक्यच नाही पण कवी कल्पना खूप छान आहे. कोण्या दुश्मानानं सुई दोराच चोरुन नेला अस ते लिहितात.

दुष्काळाचे शेतीचे शेतकऱ्याचे प्रश्न मांडणाऱ्या खूप कविता आहेत. त्यात प्रतिभा इंगोले यांनी ही आपल्या उजागरी या कवितेत शेतकरी स्त्री नवऱ्याची विणवणी करताना दिसते.

दुकायाचे दिस
शेवळीले झरा
नादारीले तसा
तुवाच आसरा
किंवा
ती म्हणते—
कामाले हलकी नायी मी कुच्चर

अशा पध्दतीने शेतकऱ्याची बायको आपल्या नवऱ्याला आधार देते. बरोबरीने काम करुन शेत करते घर सांभाळते. आणखी जे महत्वाचे कवी आहेत. त्यात ना. धं. महानोर, विठठल वाघ, सोपान हळमकर,



Scanned with CamScanner

जयराम खेडकर, इंद्रजित भालेराव, भारत सातपुते, रमेश चिल्ले, ऐश्वर्य पाटेकर

या सर्व कवींना आपण ग्रामीण कवी म्हणून ओळखतो. कारण ग्रामीण म्हणजे ग्रामीण जीवनातील शेतीतील अस्सलपण त्यांच्या कवितेत आला आहे ती कविता ग्रामीण लोकांना आपली वाटते. उदा. विठ्ठल वाघ यांची कविता

काया मातीत मातीत
तिफन चालते, तिफन चालते

किंवा इंद्रजीत भालेरावांची कविता सांगा माझ्या बापानं ही कविता

सांगा माझ्या बापानं नाही केला पेरा
तर तुम्ही काय खाल? धत्तुरा
असं म्हणण्याची खर तर माझी इच्छा नाही,
पण माझ्या बापानं आत्महत्या करुन ही
आमच्या आयुश्याला तुमची सदिच्छा नाही.

या कवितेत शेतकऱ्याचा प्रश्न खूप गहनतेने मांडला आहे. जगाला पोसणारा आज आत्महत्या करतोय. कारणे माहित असतानाही आपण त्या थांबवू शकत नाही. हेच दुर्दैव आपल्या देशाचे आहे. शेवटी कवी म्हणतात. ऐत खाऊच्या ताटात तुपाचा घिरा राहिला नसता इस पिऊन माझ्या बापाचा तुम्ही ठिवलाय फक्त चुरा आणखी काही कविता पाहता येतील. बहिणाबाई चौधरींनी आपल्या ग्रामीण कवितेतून ओवीतून शेताचे, शेतकऱ्याचे स्त्रीचे दुःख ओवीबध्द केले आहे. कुठल्याही वर्गात जाऊन न शिकलेली ही स्त्री आपल्या मनातील सर्व भाव आपल्या ओवीतून व्यक्त करताना दिसते./बहिणाबाईच्याच विचाराचा वारसा चालवणारी आणखी एक कवयत्री उदयाला आली आहे ती म्हणजे कल्पना दुधाळ, त्यांच्या सिझर कर म्हणले मातीश या कविता संग्रहाने खळबळ माजवली आहे. सोलापूर विद्यापीठाने तो संग्रह अभ्यासक्रमातही घेतला आहे.

अस्सल ग्रामीण जीवन साकार करणारा हा कविता संग्रह. आजपर्यंत ग्रामीण कविता बऱ्याच प्रमाणात लिहिल्या गेल्या. अगदी ग. ल. ठोकळ पासून आजपर्यंत पण अस्सल स्त्री जीवन मांडणाऱ्या व मातीशीच मातीमय झालेल्या पहिल्या बहिणाबाई व दुसऱ्या कल्पना दुधाळ. त्यांच्या नावातच वैनाग्कि कल्पकता व अडनावात दुधाळ म्हणजे दुधाची गोडी. या गोडी प्रमाणेच कवितेत मधाळ म्हणजे दुधाळ हा योगायोग किंवा निसर्गानेच कवयत्री म्हणून शिक्का मोर्तब केला. असे वाटते. कल्पना दुधाळांच्या कविता वाचताना बहिनाबाई चौधरी यांची आठवण येते. बहिणाबाईचा काळ वेगळा त्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागले पण त्यांच्या ओवीतून आलेल्या प्रतिमा म्हणजे स्त्री जीवनाचा हुंकारच म्हणावा लागेल. कल्पना दुधाळ यांचा काळ मात्र शिक्षणाने प्रेरित असणारा. घटनेनेच शिक्षण आवश्यक केल्याने समाजातील सर्व स्त्री पुरुष शिकतात तशाच कल्पना दुधाळ ही शिकल्या व त्यांची प्रतिभा काव्य रुपाने प्रकट झाली. माहेरी व सासरी शेतीचाच व्यवसाय असल्याने शेतीवर प्रेम, त्या प्रेमा पोटीच त्यांनी मातीला मातेचे रुप देऊन स्त्री जाणीवेतून लेखन केले आहे. बहिणाबाई व कल्पना दुधाळ या दोघींचा कवितेचा धेती हाच धागा आहे. म्हणूनच दोघींच्या कवितेत साम्य मला तरी जाणवते.

कल्पना दुधाळांचा पहिला कविता संग्रह सिझर कर म्हणजे माती या कविता संग्रहाची प्रथम आवृत्ती डिसेंबर २०१० साली निघाली व दुसरी आवृत्ती १३ जून २०१४ साली निघाली. एका नविन कवयत्रीचा पहिलाच कविता संग्रह चार वर्शात दुसरी आवृत्ती निघते यावरुनच त्या कविता रसिकांच्या मनाला जाऊन किती भिडल्या ते कळते व त्यावर किती चर्चा झाली. त्या संग्रहाला किती पुरस्कार मिळाले या वरुन कळते. कल्पना दुधाळांनी आपल्या कवितासंग्रहाच्या अर्पण पत्रिकेतच लिहिले आहे. मातीत आणि मातीसाठी राबणाऱ्या हाताना व मनोगतात त्या लिहितात, सामान्य शेतकरी कुटुंबातल्या बाईकडे घरादारातली, शेताशिवारातली, कामचं काम डोळे बटारुन बघत असताना कवितेचं वेड जोपासणं म्हणजे भिकेचे डोहाळेच. मात्र कवितांनी भिकेच्या डोव्हाळयांना सुखांच्या डोहाळयात बदललं त्यांच्या पहिल्याच कविता संग्रहाने आठरा पुरस्कार व साहित्य अकादमीने मराठी कवितेची प्रतिनिधी म्हणून दोन वेळा निमंत्रित केले इतकं यश या संग्रहाला मिळाले. आधुनिक जीवन स्वीकारलेली पण मातीची नाळ घट्ट असणारी



Scanned with CamScanner

आधुनिक बहिणाबाई असा उल्लेख करणे गैर नाही बहिणाबाईनी शेतीशी हितगुज केले तशीच कवितेचा वीण कल्पना दुधाळांची आहे. त्यांनीही मातीचाच म्हणजे षेताचान विचार आपल्या कवितेतून केला पण तो आधुनिक संस्कृतीचा आधार घेऊन कारण आज आधुनिकरण सर्वत्र झालेले आहे.

सिझर कर म्हणजे माती या कविता संग्रहाच्या दुसऱ्या आवरत्ती मध्ये कवितांची तीन विभागात विभागणी केली आहे. पहिला विभाग वरचा बांध अस्तित्व, मधला बांध, चिखलात कोरलेले ठसे, व मधला बांध सये ग असे वर्गीकरण केले आहे. वर्गीकरण करतानाही शेतीचा बांध हीच कल्पना घेतली आहे. इतक्या त्या शेतीशी एकरुप झाल्या आहेत. किंवा मातीशी एकरुप किंवा मातीमय झाल्या आहेत असे म्हणणे ही वावगे ठरु नये

मी टाकलेली मेथी आणि कोथिंबीर
मागते या माझ्याकडे
युरियाचा खाऊ
आणि लुसलुसीत व्हायचं स्प्रेअर
रखरखीत झाडाच्या सालीन
मॉइष्चरायझरच्या हट्ट धरलाय
आणि माती अडून बसलीय
सिझर कर म्हणत
मी काम करु

आजची शेती ही रासायनीक खतावरच पोसली जाते हा संदर्भ घेऊन कवयत्री लिहतात ती मातीच म्हणत आहे सिझर कर. कल्पना दुधाळ सुरवातीला लिहितात

मातीतून चालता मी, मातीच होऊन जाते
गर्भात हिरवे कोंब, खुषाल उगवू देते.

या ओळीने तर अस वाटते की खरच कल्पना दुधाळ मातीमय होऊन गेल्या आहेत. कल्पना दुधाळांच्या कवितेबद्दल उत्तम कांबळे लिहितात, तिच्या बांधावर ही जागतिकीकरणाचा वारा वाहतो आहे आणि झाडाझुडपांतून अंग चोरुन येणाऱ्या थंडगार गाववाऱ्याला तो बाहेर ढकलतो आहे. तिच्या षिवारावरही मोबाईलची रेंज पोचू लागली आहे. मोबाईलवरुन आणि बाजूनंही बळीराजाच्या मरण बातम्या घुसखोरी करुन येतात आणि थेट तिच्या कानापर्यंत पोचतात. रेंज मिळाली की माणूस हवेत तरंगतो रेंज उडाली की खाली कोसळतो. अगदी काटेरी बोरीच्या झुडपात उत्तम कांबळे कल्पना दुधाळाची कविता वाचून आपले मत मांडतात की आज ग्रामीण भागात अगदी शेतात ही आधुनिकतेचे वारे वाहू लागले आहेत. पण शेतकऱ्याचा दुष्काळाचा, आत्महत्येचा प्रश्न सोडवत नाही आणि तोच प्रश्न कल्पना दुधाळांनी मांडला आहे पुढे ते लिहितात, कल्पना दुधाळांची कविता म्हणजे श्वहुआयामी आणि अस्वस्थ श्वास सोडणारी कल्पनांची कविता प्रत्येकाला अस्वस्थ करते मोठा पिसारा घेऊन ती जागतिकीकरणाला आणि शेतकऱ्यांची आत्महत्या पकडते.

कल्पना दुधाळांनी शेतकऱ्याचा प्रश्नांचा सखोलतेने वेध घेतला आहे. आजची सामाजिक, राजकीय, अर्थिक परिस्थितीचा विचार मांडून जागतिकीकरणांचा ही उददेश व्यक्त केला आहे. त्यामुळेच कल्पना दुधाळांची कविताही एक श्रेष्ठ कविता ठरते. त्यांची कविता मार्गही दाखवते. त्यांची चुल ही कविता तर थेट बहिणाबाईची आठवण करुन देते.

माझं जगणं जळत
होंऊनी सरपण
जन्म बाईचा ग सये
बोरी बाभळीच बन

किंवा

राख चुलीची भरता
हात भासतो ग कधी
मूठभर राख माझी
मीच भरते ग कधी

वरील दोन कडव्यांनी स्त्रीच्या जीवनाचे चित्रण केले आहे. की स्त्री चुलीला जाळही लावते व स्वतःच जळत ही असते. कल्पना दुधाळांनी एक स्त्री म्हणून शेतीची काळयाआईची तर व्यथा मांडलीच पण बाईची ही व्याथा मांडली आहे.

बाप झाला पावसाळा
माय उन्हाची काहिली
करपून गेले ऋतू
भुई वांजोटी राहिली.

भुई या कवितेत कवयत्रीने पाऊस नाही आला तर भुई कशी वांजोटी राहते हे सांगितले आहे. आजपर्यंत



Scanned with CamScanner

बऱ्याचदा दुष्काळ पडला पण शेतकऱ्यांनी कधी आत्महत्या केली नाही. पण हल्ली रोज पेपरमध्ये शेतकऱ्याच्या आत्महत्यची बातम्या येतात. त्यावरही कल्पना दुधाळ आपल्या कुसळाचं गाव या कवितेत लिहितात

आठराविश्व दारिद्रय
गावाला तस नव नव्हत
कर्जापायी फाशी मेणं
गावाला कधीच ठाव नव्हतं

ग्रामीण कवितेतून पहिल्यांदा कल्पना दुधाळांनी ग्रामीण भाग व षहरी भाग यांच्यातील हल्ली असणारे साम्य व्यक्त केले आहे. जागतिकीकरणाचे चटके शहरी व ग्रामीण दोन्ही भागातील लोकांना बसत आहेत. मोबाईल, टीव्ही, इंटरनेट आज गावाच्या कानाकोपऱ्यात पोहचले, सुधारणा झाली. पण शेतकऱ्यांचे प्रश्न आहे तसेच आहेत. एवढेच म्हणावे लागेल मात्र आमचे शेत ही सिझर कर असे म्हणत आहे.

**संदर्भ सूची :—**

१. ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, चंद्रकुमार नलगे
२. मातृपंचक— संपादक डॉ. स्नेहल तावरे, डॉ. वेदश्री भिंगणे
३. सिझार कर म्हणजे माती— कल्पना दुधाळ
४. माय लेकरं— आनंद यादव
५. काव्यकस्तुरी— संपादक, डॉ. स्नेहल तावरे

❑ ❑ ❑

**23**

# उच्च प्राथमिक स्तरावरील पाठ्यक्रमातून आपत्ती व्यवस्थापनासंबंधित घटकांवर पूरक पुस्तिका विकसित करून तिच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**डॉ. सुषमावती जयवंत पाटील**
असोसिएट प्रोफेसर
अॅड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक

************

प्रास्ताविक

संशोधनासाठी 'उच्च प्राथमिक स्तरावरील पाठ्यक्रमातून आपत्ती व्यवस्थापनासंबंधित घटकांवर पूरक पुस्तिका विकसित करून तिच्या परिणामकारकतेचा अभ्यास' हा विषय असून शिक्षकांना अध्यापन करतांना आपत्ती व आपत्ती व्यवस्थापन संबंधी माहिती देण्यासाठी पूरक पुस्तिका तयार केलेली आहे. प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २००४ अन्वये शासनमान्य पाठ्यक्रमानुसार मराठी, हिंदी, इतिहास, भूगोल, विज्ञान अशा पाठ्यपुस्तकातून ज्या प्रकरणांमधून थोडीफार माहिती आपत्तीशी संबंधित होती ते शिकवितांना शिक्षकांनी आणि व्यवस्थापनाची पूरक माहिती द्यावी व जागरुकता वाढवावी. या हेतूने हे संशोधन आहे. 'आपत्ती म्हणजे अशी घटना की, ज्यामुळे अगदी आकस्मिकपणे प्रचंड जिवितहानी व अन्य प्रकारची हानी संभवते.' तर आपत्तीपासून बचाव करणे, आपत्तीला तोंड देणे आणि आपत्तीमधून पूर्वस्थितीला येण्यास समर्थ बनविण्यासाठी पूर्वनियोजनाची दृष्टी म्हणजे आपत्ती व्यवस्थापन होय. आपत्तीला तोंड देण्याची क्षमता असे शिक्षण शाळेतून मिळू शकते. आपत्ती प्रतिबंधात्मक उपाय, निवारण व पुनवर्सन आणि पुनर्निर्माण अशा अंगाचा विचार होऊन कृती आराखडा तयार करता येतो. अचानक नैसर्गिक किंवा मनुष्यनिर्मित कारणांनी आपत्ती ओढवू शकते म्हणून आपत्तीत बचाव व मदत कार्य महत्वाचे ठरते. आपत्ती व्यवस्थापन ही काळाची गरज आहे. जागतिक पातळीवर 'आपत्कालिन व्यवस्थापन आराखडा' तयार आहे. तर भारतातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प- 'आपत्ती जोखीम व्यवस्थापन कार्यक्रम' आहे. या प्रकल्पातर्गत भारतातले आपत्ती



Scanned with CamScanner